ग्राम पंचायत टेकाडी(को.ख.)
ता. पारशिवनी जि. नागपुर
जा. क्रं २०५/२०२६
दि. १०/०४/२०२६

## विद्युत/दिवाबत्ती साहित्य पुरवठा करण्याबाबत

ई– निविदा सुचना क्रं. ०२

याद्वारे अधिकृत साहित्य पुरवठाधारकांना सुचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत टेकाडी (को. ख.) करिता सन २०२६–२७ मध्ये ग्राम निधी व इतर शासकिय योजना अंतर्गत विद्युत/दिवाबत्ती साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणेकरीता ई निवीदा मागविण्यात येत आहे. ईच्छुक पुरवठादारानी आपले दर मोहरबंद्या दर पत्रकामध्ये **दिनांक २२/०५/२०२६** रोजी दु २:०० वाजे पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सादर करावे. उशिरा आलेल्या निवीदेचा विचार करण्यात येणार नाही.

**अटी व शर्ती**

१. सदर संपुर्ण निवीदा प्रक्रिया ई निवीदा द्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निवीदा संदर्भातील निवीदा प्रसिध्दी सुचना इत्यादीची माहीती https://mahatenders.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२. वरील कामाचे निवीदा पत्रके http//mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्या आली आहे. सदर निवीदा पत्रके अटी व शर्ती ई–संकेतस्थळावर **दिनांक** १५/०५/२०२६ ला स. ११:०० वाजेपासुन ते **दिनांक** २२/०५/२०२६ दु २:०० वाजेपर्यंत अधिग्रहित (Download) करता येईल.

३. सदर कामाचा निवीदा बाबद खालील बाबी आवश्यक राहतील.
   क) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (फोटो सहित) व प्राप्ती कर स्कॅन करून (Upload) करावी लागेल.
   ख) वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र व पॅन कार्ड अपलोड करावे लागेल.
   ग) निवीदा प्रपत्रातील सविस्तर निवीदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहील.

४. निवीदा फार्म किमत रू. ५००/– व अनामत रक्कम रू. १०००/– निविदेसोबत धनाकर्ष (DD) सचिव ग्राम पंचायत टेकाडी (को.ख.) या नावाने स्कॅन करून अपलोड करावा लागेल व धनाकर्ष (DD) ग्रामपंचायतला दिनांक २२/०५/२०२६ दुपारी ५:०० वाजेपर्यंत सादर करावा लागेल.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या लिफाफा क्र १ (तांत्रीक लिफाफा) शक्यतो **दिनांक** २२/०५/२०२६ रोजी दुपारी १२:०० नंतर https://mahatenders.gov.inया संकेत स्थळावर ग्रामपंचायत कार्यालय टेकाडी (को. ख.) येथे उघडण्यात येईल. निवीदा बाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना शुध्दी पत्रक अथवा इतर माहीती http//mahatenders.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध आहे/ करून देण्यात येईल.

६. सदर कामाच्या तीन योग्य निवीदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही.

७. पुरवठाधारकातर्फे कोणत्याही शर्ती व अटी घालुन सादर केलेल्या ई–निवीदा स्विकारल्या जाणार नाही.

८. नियमानुसार देयकामधुन आयकर, वस्तु सेवा कर इत्यादी कपात करण्यात येईल.

९. निवीदा धारकांना कोणतेही पुर्वसुचना / कारण न दर्शविता एक अथवा सर्व निवीदा मंजुर / नामंजुर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील व त्याबाबत कारणे देणे, पत्र व्यवहार करणे हे बंधनकारक राहणार नाही.

१०. निवीदा मंजुर झाल्यास रू १०० /– च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

११. नमुद केलेल्या दरामध्ये कोणतीही प्रकारची सुधारणा करून मिळणार नाही. तसेच साहित्य पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास पुरवठादारास पुढिल ५ वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात येईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे बांधकाम साहित्य ग्राम पंचायत क्षेत्रातील कार्यस्थळावर सात दिवसाच्या आत सर्व शासकिय करासहित स्वखर्चाने कार्यालयीन आदेश मिळाल्यावर पोहचता करावी लागेल. तसेच साहित्य चांगल्या प्रतीचे व प्रमाणबध्द पुरवठा करणे बंधणकारक राहिल.

१३. मंजुर निवीदा धारकाने वेळेवर व मुदतीत चांगल्या प्रकारचे प्रमाणबध्द बांधकाम साहित्य पुरवठा करण्यास चालढकाल/ टाळाटाळ केली तर मंजुर दरानुसार निवीदाधारक क्र २ किंवा इतर कोणत्याही साहित्य पुरवठाधारकाकडुन साहित्य खरेदी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहिल.

१४. बाजार दरातील तफावतीनुसार वाढिव दर अनुज्ञेय राहणार नाही.

१५. स्विकृत निवीदाधारकाने पुरवठा केलेल्या साहित्य सामुग्रीमध्ये तकार असल्यास वा साहित्य अयोग्य आढळल्यास सर्व सामुग्री स्वखर्चाने वापस नेऊन योग्य असलेली सामुग्री स्वखर्चाने पुरवठा करावी लागेल. पुरवठा करण्यास कसुर केल्यास निवीदा धारकावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा व कोणतेही कारण न दर्शविता निविदा रदद करण्याचा अधिकार ग्रामपचांयत कडे सुरक्षित आहे.

१६. ग्रामपंचायतीला उपलब्ध निधीनुसार देयके देण्यात येईल. विलंब शुल्क देय होणार नाही.

सरपंच
ग्राम पंचायत टेकाडी (को.ख)

ग्राम पंचायत अधिकारी
ग्राम पंचायत टेकाडी (को.ख)

Scanned with OKEN Scanner

ग्राम पंचायत टेकाडी(को.ख.)
ता. पारशिवनी जि. नागपुर

## ई–निवीदा सुचना क्रं. ०२

ग्राम पंचायत टेकाडी (को.ख) पंचायत समिती पारशिवनी जिल्हा नागपुर याद्वारे अधिकृत साहित्य पुरवठाधारकांना सुचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत टेकाडी (को. ख.) करिता सन २०२६–२७ मध्ये ग्राम निधी व इतर शासकिय योजना अंतर्गत विद्युत/दिवाबत्ती साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणेकरीता ई निवीदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.

| तपशील | दरपत्रक विक्री व स्विकृत दिनांक | शक्यतो ई–निवीदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|
| ग्राम पचायत टेकाडी (को.ख) करिता सन २०२६–२७ वर्षाकरीता ग्राम निधी व इतर शासकिय योजना अंतर्गत विद्युत/दिवाबत्ती साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | दि. १५/०५/२०२६ स. ११:०० वा. ते दि. २१/०५/२०२६ दुपारी २:०० वाजेपर्यंत | दिनाक २१/०५/२०२६ दुपारी ०२:०० वाजता नंतर |

सरपंच ग्राम पंचायत अधिकारी
ग्राम पंचायत टेकाडी (को.ख)

Signature Not Verified
Digitally signed by VINOD KUMAR RADHELAL INWATE
Date: 2026.05.14 16:02:10 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner